पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे - १७
ड प्रभाग समिती,
कार्यपत्रिका क्र.७
सभावृत्तांत

दिनांक १०/१०/२०१३ वेळ दुपारी १२.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची मासिक सभा गुरुवार दि. १०/१०/२०१३ रोजी दुपारी १२.०० वाजता ड प्रभाग कार्यालयाच्या छत्रपती शाहू महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. सदर सभेस पुढीलप्रमाणे सन्मा.सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा.सोनाली जम | अध्यक्षा |
| २... | मा.कैलासभाऊ थोपटे | सदस्य |
| ३. | मा.अप्पा पवार | सदस्य |
| ४. | मा.निलेश बारणे | सदस्य |
| ५. | मा.श्रीरंग बारणे | सदस्य |
| ६. | मा.विनय गायकवाड | सदस्य |
| ७. | मा.बापू काटे | सदस्य |
| ८. | मा.राजेंद्र जगताप | सदस्य |
| ९. | मा.विमल काळे | सदस्या |
| १०. | मा.निता पाडाळे | सदस्या |
| ११. | मा.अनिता तापकीर | सदस्या |
| १२. | मा.विमलताई जगताप | सदस्या |
| १३. | मा.झामाबाई बारणे | सदस्या |
| १४. | मा.आरती चोंधे | सदस्या |
| १५. | मा.शितल काटे | सदस्या |
| १६. | मा.वैशाली जवळकर | सदस्या |
| १७. | मा.शैलजा शितोळे | सदस्या |

याशिवाय मा.पी.एच.झुरे, प्रभाग अधिकारी, मा.व्ही.एम.इंगुळकर, प्रभारी प्रशासन अधिकारी, सभा शाखा मा.गुलाब दांगट, कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा.एस.एस.चव्हाण, कार्यकारी अभियंता विदयुत, मा.शरद जाधव, कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग, मा.एम.डी.निकम , कार्यकारी अभियंता, जलनिसारण विभाग, मा.सोमनाथ परदेशी, उपअभियंता, स्थापत्य, मा.डी.एस.सोनवणे, उपअभियंता,स्थापत्य, मा.एस.डी.पोरेडी, उपअभियंता, स्थापत्य मा.रामनाथ टकले उपअभियंता, स्थापत्य, मा.रविंद्र पवार, उपअभियंता जलनिसारण विभाग, मा.शेख, उपअभियंता पाणीपुरवठा

विभाग, मा.दिलीप धुमाळ, उपअभियंता , विदयुत, मा.पी.एस.केदारी, उपअश्रियंता विदयुत, मा.राजेंद्र जावळे, उपअभियंता पाणीपुरवठा विभाग, मा.व्ही.एल.चव्हाण सहा आरोग्याधिकारी , मा.बेडाळे, सहा.आरोग्याधिकारी , इत्यादी अधिकारी उपस्थित होते.

सभेच्या सुरुवातीस मा.अध्यक्ष यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात केली. तदनंतर मा.अध्यक्ष यांनी मागील कार्यपत्रिका क्रमांक ६ दिनांक ६/९/२०१३ रोजीच्या सभेचा सभावृत्तांत कायम करण्यात आल्याचे प्रकट केले.

तदनंतर मा.अध्यक्ष यांचे मान्यतेने व मा.सदस्य यांचे मागणीप्रमाणे ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेण्यात आले.

विषय क्र.१ सुदर्शननगर पिंपळेगुरव स.नं.८१ मधील अरमः बिल्डींग व श्री कृष्ण (श्री.काळे यांचे घर) हयाच्यामधील रस्त्यास श्री महावीर स्वामी मार्ग सुदर्शननगर असे नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२ सांगवी नवी सांगवी हृददीलगत पवना नदीवरील घाटाला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर असे नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.सोनाली जम यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३ महिलांना आरोग्य तपासणीची मोफत सुविधा उपलब्ध करुन देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.शितल काटे यांचा प्रस्ताव..

विषय क्र.४ वॉर्ड क्रमांक ४८ मधील आदिनाथ कॉलनी येथील वाचनालय काढणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५ उडडाण पुलास नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.आरती चौंधे यांचा प्रस्ताव

विषय क्र.६ नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.निलेश बारणे यांचा प्रस्ताव.

ठराव क्रमांक ३० विषय क्र.१
दिनांक १०/१०/२०१३ विभाग - स्थापत्य
सुचक - मा.वैशाली जवळकर अनुमोदक - मा.शैलजा शितोळे

संदर्भ :- मा.वैशाली जवळकर यांचा दिनांक १०/१०/२०१३ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक ५६ वैदुवस्ती येथील अरमः बिल्डींग (भंडारी यांचे घर) व श्रीकृष्ण बिल्डींग (श्री.काळे यांचे घर) यामधील रस्ता जो पुर्व व पश्चिम आहे. पुर्वेस ६० फुटी रस्त्यास जोडला जातो व पश्चिमेस ४० फुटी रस्त्यास जोडला जातो त्या रस्त्यास श्री महावीर स्वामी मार्ग पिंपळेगुरव असे नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक ३१ विषय क्र.२
दिनांक १०/१०/२०१३ विभाग - स्थापत्य
सुचक - मा.सोनाली जम अनुमोदक - मा.वैशाली जवळकर

संदर्भ :- मा.सोनाली जम यांचा दिनांक १०/१०/२०१३ रोजीचा प्रस्ताव.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी प्रतिष्ठान, पिंपळेगुरव यांचे निवेदन पिंपरी चिंचवड मनपाच्या वतीने सांगवी व नवी सांगवी हददीलगत पवना नदी किनारी पुरेशा प्रमाणात पत्राशेड उभारुन नव्याने घाट तयार केला आहे या ठिकाणी सध्या दशक्रिया विधी व गणपती विसर्जन होतो या घाटास पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नांव दिल्यास योग्य होईल.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांची जन्मभूमी महाराष्ट्रातच असून त्यांनी त्या काळामध्ये राज्यकारभार करतांना आपल्या कर्तृत्वाचा वारसा व ठसा संपुर्ण भारतात निर्माण केला त्यांनी अनेक मंदीरे, धर्मशाळा जलकुंड रस्ते, नदीवरील घाट व तिर्थक्षेत्राचा जिर्णोध्दार केला. आजही हे सर्व लोकांच्या सेवेसाठी निरंतर उपयोगात आहे. आपलया कल्पनेतून एक वेगळया प्रकारचे स्थापत्य कला निर्माण केली. येथील नदीवरील घाटाला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांचे नांव दिल्यास त्यांनी जनतेसाठी केलेल्या ख-या कार्याचे स्मरण या घाटाला नांव दिल्याने होत राहील.तरी सांगवी-नवी सांगवी घाटाला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घाट असे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक ३२ विषय क्र.३
दिनांक १०/१०/२०१३ विभाग -
सुचक - मा.शितल काटे अनुमोदक - मा.अनिता तापकीर

संदर्भ :- मा.शितल काटे यांचा दिनांक १०/१०/२०१३ रोजीचा प्रस्ताव.

मनपाच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत शहरातील महिला व लहान मुलांसाठी विविध योजना राबविल्या जातात त्यामागे महिलांनी स्वतःच्या पायावर उभे रहावे हा उददेश आहे मात्र सध्या महिलांच्या आरोग्याचा मोठा प्रश्न समाजासमोर आहे. त्यासाठी महापालिकेने पुढाकार घेण्याची गरज आहे शहरातील प्रत्येक महिलेमध्ये आरोग्य जनजागृती निर्माण करण्यासाठी मनपामार्फत नियोजन करण्याची आज गरज निर्माण झाली आहे मनपा वेगवेगळया विकासकामांवर दरवर्षी हजारो कोटी रुपये खर्च करते. मात्र शहरातील महिलांचे आरोग्य चांगले नसेल तर बेस्ट सिटी पुरस्कार मिळवलेल्या मनपाला हे भूषणावह नाही.

शहराच्या विकासासाठी आपण स्वतः पुढाकार घेऊन वेगवेगळया क्षेत्रासाठी धोरण निश्चित करण्याचे काम आपण हाती घेतले आहे त्याच धर्तीवर शहरातील महिलांच्या आरोग्याची गंभीर दखल घेवून महिलांना कोणकोणत्या सुविधा मोफत किंवा माफक दरात देता येतात. याबाबत एक धोरण मनपाने ठरवावे महिला निरोगी राहिल्यास एक कुटुंब निरोगी राहते याचा विचार या धोरणात करावा त्यामुळे संपुर्ण शहर निरोगी राहील शहरातील महिलांना अत्यावश्यक असणारे रुबेला व्हॅक्सिनेशन स्तनाच्या रोगाची तपासणी (ब्रेस्ट कॅन्सर) करण्यासाठी मेमोग्राफी टेस्ट तसेच हिमोग्लोबिन तपासणी करण्याची मनपाच्या रुग्णालयामध्ये मोफत सुविधा उपलब्ध करुन दयावे त्यासाठी मनपाच्या पुढील अर्थसकल्पापासून स्वतंत्र लेखाशिर्ष तयार करण्यात यावे. सबब सदरच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक ३३ विषय क्र.४
दिनांक १०/१०/२०१३ विभाग - स्थापत्य
सुचक - मा.अनिता तापकीर अनुमोदक - मा.विमल काळे

संदर्भ :- मा.अनिता तापकीर यांचा दिनांक १०/१०/२०१३ रोजीचा प्रस्ताव.

वॉर्ड क्रमांक ४८ मधील आदिनाथ कॉलनी येथे सार्वजनिक वाचनालय आहे. सदर वाचनालयाचा नागरीक गैरवापर करीत असल्यामुळे सदर वाचनालय तातडीने काढणे आवश्यक आहे. सदर भागातील नागरीक हे सदर वाचनालय काढणेबाबत वारंवार मागणी करीत आहेत. तरी सदर आदिनाथनगर येथील वाचनालय काढणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक ३४ विषय क्र.५

दिनांक १०/१०/२०१३ विभाग - स्थापत्य

सुचक - मा.आरती चोंधे अनुमोदक :- मा.अनिता तापकीर

संदर्भ :- मा.आरती चोंधे यांचा दिनांक १०/१०/२०१३ रोजीचा प्रस्ताव

डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी यांना समाजकार्याबददल सन २००८ साली महाराष्ट्र भूषण पुरस्कार देवून सन्मानीत करण्यात आले अशा थोर समाजसेवकाचे नांव औंध रावेत बीआर.टी.रोडवरील काळेवाडी फाटा चौक येथील उडडाण पुलास डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी उडडाण पुल असे नांव देण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक ३५ विषय क्र.६

दिनांक १०/१०/२०१३ विभाग - स्थापत्य

सुचक - मा.संपत पवार अनुमोदक :- मा.विमलताई जगताप

संदर्भ :- मा.निलेश बारणे यांचा दिनांक १०/१०/२०१३ रोजीचा प्रस्ताव

थेरगांव येथील मुख्य चौकातील श्री.शिवाजी महाराज अश्वारुढ पुतळयाजवळील उडडाण पुलास श्री.छत्रपती शिवाजी महाराज उडडाण पुल असे नामकरण करण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव कायम होणेची वाट न पहाता पुढील कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

यानंतर मा.अध्यक्षा यांनी सभा संपल्याचे प्रकट केले.

सही/-
सोनाली जम
अध्यक्षा
ड प्रभाग समिती,पिं.चिं.म.न.पा.,
रहाटणी, पुणे ज्ञ १७

सही/-
प्रशासन अधिकारी सभा शाखा
ड प्रभाग समिती ,पिं.चिं.म.न.पा.,
रहाटणी, पुणे - १७

जा.क्र.ड/सभा/कावि/३० /२०१३
दिनांक ६ /१२ /२०१३
प्रति,
मा.श्री./श्रीमती -----------------------
सदस्य / सदस्या ड प्रभाग समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका